ARTHA
Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. P. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २६ डिसेंबर, १९५६ | अंक ४९

## विविध माहिती

**अणुकिरणांपासून बचाव करणारा पोषाख**—अणुकिरणें, रोगजनक जंतू आणि घातक रसायनें ह्यांच्यापासून संरक्षण करणारा संपूर्ण पोषाख लवकरच पश्चिम जर्मनींत विकत मिळूं लागेल. पोषाखाच्या तीन तऱ्हा आहेत. औद्योगिक कामासाठी एक, लष्कराकरतां एक आणि सामान्य नागरिकांकरतां एक. नागरिकांच्या पोषाखाला सुमारें ६६ पौंड पडतील.

**आंतरजातीय विवाहांतील धोका**—जबलपूर येथील एका जैन जातीच्या तरुण डॉक्टरानें सिंधी जातीच्या मुलीशीं लग्न केलें. विवाहानंतर नवविवाहित जोडपें मुंबईहून जबलपूरला आलें तेव्हां त्यांच्यावर अनवस्था प्रसंग ओढविला. कारण, त्यांच्या ‘पापकृत्याबद्दल’ जैन समाजाच्या पंचायतीनें त्या जोडप्याला समाजबहिष्कृत केलें आहे.

**सुताची सहकारी गिरणी**—हैद्राबाद येथें सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी एक सुताची गिरणी लवकरच काढण्यांत येणार आहे. गिरणीमध्यें सुरवातीला १२,००० चात्या असतील. प्राथमिक सहकारी संस्थांकडून भांडवल म्हणून ५ लाख रुपयांचें भांडवल जमा करण्यांत आलें आहे. १० लाख रु. भांडवल जमल्यावर भारतीय सरकार १० लाख रुपयांची मदत देईल.

**डॉक्टर अंबेडकरांची समाधि**—डॉ. अंबेडकर ह्यांची समाधि नागपूर येथें बांधण्यांत येणार आहे. गेल्या ऑक्टोबरमध्यें त्यांनीं बौद्ध धर्माचा स्वीकार ज्या ठिकाणीं केला, ती जागा समाधिस्थानासाठी निवडण्यांत आली आहे. रोजगार असलेला प्रत्येक बौद्ध आपली एक दिवसाची मिळकत समाधीच्या खर्चासाठी देणार आहे. समाधींत त्यांच्या कांहीं अस्थी पुरण्यांत येतील.

**हंगेरींतून आलेले निर्वासित**—हंगेरींतील अस्थिर राजकीय परिस्थितीला कंटाळून ९०,००० हंगेरिअन नागरिक ऑस्ट्रिआंत आले आहेत. त्यांची तात्पुरती सोय करणेंहि ऑस्ट्रिआच्या सरकारला कठीण जात आहे. पूर्व ऑस्ट्रिआंतील सर्व शाळा बंद करण्यांत आल्या असून त्यांच्या इमारतींतून व इतर सार्वजनिक इमारतींमधून निर्वासितांची व्यवस्था कशीबशी लावण्यांत येत आहे.

**मोटारींच्या उत्पादनांत वाढ**—१९५५ सालीं भारतांत जितक्या मोटारींचें उत्पादन करण्यांत आलें त्याच्यापेक्षा अधिक उत्पादन १९५६ सालच्या पहिल्या नऊ महिन्यांत करण्यांत आलें. हे आंकडे अनुक्रमें २३,७९१ व २३,०८४ असे आहेत. सरकारनें मान्य केलेल्या सहाहि कंपन्या भारतीय मालकीच्या आहेत. त्यापैकी तीन कंपन्यांत परकीय भांडवल मुळींच नाहीं.

**कॉर्पोरेशनचें फिरतें कोर्ट**—बंगलोरचें कॉर्पोरेशन गुन्ह्यांची चौकशी करण्यासाठी फिरतें कोर्ट उघडण्याचा विचार करीत आहे. ह्या कोर्टापुढें परवानगी न घेतां बांधकामाबद्दल केल्याचें व कॉर्पोरेशनच्या हद्दींत अनधिकृतपणें माल विकल्याबद्दलचे खटले चालतील. अशा प्रकारच्या गैरकायदा कृत्यांत अलीकडे फार वाढ झाल्याचें दिसून आलें आहे.

**भाक्रा–नांगल योजनेसाठीं कर्ज**—भाक्रा–नांगल योजनेला येणाऱ्या खर्चांतील १९५६–५७ सालांतील आपल्या वाट्यापैकी ३०० लाख रुपयांची रक्कम भारतीय सरकारनें कर्ज म्हणून पंजाब सरकारला दिली आहे. आतांपर्यंत मध्यवर्ती सरकारनें ह्या कामासाठी राज्य सरकारला १२१·०१ कोटी रुपये कर्जाऊ दिले आहेत.

**काश्मीरमधील क्षयविरोधी मोहीम**—काश्मीर राज्यांतील क्षयरोगाचा प्रसार थांबविण्याची मोहीम सरकारनें सुरू केली आहे. क्षयरोग्यांना त्यांच्या घरींच उपचार करण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. दोन तज्ज्ञ डॉक्टर्स, जरूर तो इतर नौकरवर्ग आणि दोन जीप गाड्या उपचारकेंद्रासाठी देण्यांत आल्या आहेत. तूर्त ५०,००० रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत.

**इजिप्तसाठीं भारतीय चहा**—भारतामधून २२ लाख पौंड चहा आयात करण्याची परवानगी इजिप्तच्या सरकारनें दिली आहे. ह्या चहाची किंमत सुमारें ८० लाख रुपये होईल. इजिप्तवर इंग्लंड–फ्रान्सनें हल्ला केल्यापासून चहाची आयात बंद पडून त्याच्या किंमतींत वाढ होत चालली आहे. भारताकडून आणखी चहा आयात करण्यास परवाने मिळतील असा अंदाज आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**विमा नोकरांना पेन्शन**—भारतीय सरकारच्या आयुर्विमा कॉर्पोरेशननें विम्याचा धंदा आपल्या ताब्यांत घेतला. त्यावेळीं सहा परदेशी कंपन्यांनीं आपल्या नोकरांना पेन्शन देण्याची व्यवस्था चालू केलेली होती. ह्या व्यवस्थेमुळें कॉर्पोरेशनवर नेमका किती बोजा पडेल तें आजच सांगतां येत नाहीं. परंतु ही रक्कम १५ लाख रुपयांच्या जवळपास असेल, असें समजतें.

**हातमागांना लागणारे सुटे भाग**—हातमागांना लागणाऱ्या जरूरीच्या सुट्या भागांचें उत्पादन करण्यासाठीं मद्रास सरकारनें एक केंद्र काढण्याचें ठरविलें आहे. कारखाना सालेम येथें काढण्यांत येणार असून त्यासाठीं भांडवली स्वरूपाचा १०·५ लाख रुपये खर्च येईल. कारखान्याचे सर्व विभाग चालू झाले म्हणजे ४२० कसबी कामगारांना रोजगार मिळेल.

**कराचींत किंमती भडकल्या**—कराचींतील नागरिकांना रोजखपाच्या वस्तूंसाठी भलत्याच किंमती द्याव्या लागत आहेत असें समजतें. दाढी करण्याचीं परदेशी पातीं, सौंदर्य प्रसाधनें, दंतमंजनें, इत्यादि वस्तू दुर्मीळ झाल्या असून त्यांच्या किंमती एका आठवड्यांत १५ ते ४० टक्क्यांनीं वाढल्या आहेत. वाढत्या किंमतीविरुद्ध वाटेल तो उपाय करण्याचा इशारा सरकारनें दिलेला आहे.

**स्टेनलेस स्टीलचा धंदा**—मुंबईला नव्यानेंच स्थापन करण्यांत आलेल्या, स्टेनलेस स्टीलच्या उद्योगधंद्याच्या संघानें भारतीय सरकारला अशा प्रकारचें पोलाद भारतांत तयार करण्याविषयीं सूचना केली आहे. ह्या पोलादाच्या पुरवठ्यासाठीं भारताला दरसाल सरासरी ३ कोटी रुपयांची परदेशीय हुंडणावळ द्यावी लागते.

**सिमेंटचे नवे कारखाने**—आंध्र राज्यांत लवकरच सिमेंट तयार करणारे सात नवे कारखाने काढण्यांत येणार आहेत, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. सर्व कारखान्यांसाठी मिळून सुमारें ७ तें ८ कोटी रुपये भांडवल लागेल. कारखान्यांना भारतीय सरकारकडून व राज्य सरकारकडून सर्व प्रकारची मदत देण्यांत येत आहे.

**तेनसिंगाच्या जीवनावर बोलपट**—हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर पदार्पण करणारा पहिला हिंदी नागरिक तेनसिंग ह्याच्या चरित्रावर आधारलेला बोलपट काढण्याची तयारी कांहीं ब्रिटिश व अमेरिकन निर्मात्यांनीं दाखविली होती. भारतीय सरकारचा आक्षेप नसेल तर आपल्या आत्मचरित्रावर आधारलेला चित्रपट काढण्यास आपली हरकत नसल्याचें तेनसिंग ह्यांनीं प्रकट केलें आहे.


मराठी भाषिक सर्वसामान्य जनतेच्या उपयोगाकरितां

**नवा हिंदु वारसा कायदा**

**( १९५६ चा )**


लेखक : विठ्ठल रामचंद्र फडके, एम्. ए., एलएल् बी., वकील ( रि. सि. जज्ज ) पुणें.

हिंदु स्त्री–पुरुषांच्या वारसा हक्कांत, मिळकतीवरील स्त्रियांच्या हक्कांत व मृत्युपत्र करण्याच्या हक्कांत झालेले क्रांतिकारक बदल सोप्या भाषेंत समजावून देणारें हें एकमेव पुस्तक प्रकाशकाकडे व सर्व प्रमुख पुस्तकविक्रेत्यांकडे विकत मिळेल. [ किंमत १। रुपया, शिवाय टपालखर्च ]

प्रकाशक : हे. वि. फडके, श्रीकृष्णकुंज, ८२० भां. इं. रोड, पुणें ४.

**किर्लोस्कर** लहान, मोठे

**लोखंडी नांगर**




भारी, मध्यम प्रतीच्या व रेताड जमिनींच्या सर्वोत्कृष्ट नांगरटीसाठीं निरनिराळ्या बनावटींचे योग्य असे लहान व मोठे नांगर तयार होतात. आपल्या जमिनीच्या मगदुराप्रमाणे नांगरांची निवड करा.

*** दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ***

**( शिड्यूल्ड बँक )**

हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ ) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन ३०४०८ )

| अध्यक्ष | | | उपाध्यक्ष |
|---|---|---|---|
| श्री. ग. रा. साठे | अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० | श्री. दा. ग. बापट |
| | जमा झालेलें भांडवल ... ... | रु. ७,३३,१३५ | |
| | खेळतें भांडवल ... ... | रु. ६२,००,००० | |

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १। टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, ( बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. ) मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. २६ डिसेंबर, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रिझर्व्ह बँकेजवळील सोन्याच्या किंमतींत वाढ

रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्यांत रिझर्व्ह बँक कायद्याप्रमाणें किमान ४० कोटी रुपये किंमतीचें सोनें कायम राखावें लागत असे. त्याप्रमाणें, इश्यू खात्यांत तोळयास २१ रु. ३आ. १० पै, ह्याप्रमाणें ४० कोटी, २ लक्ष रुपये किंमतीचें सोनें रिझर्व्ह बँकेजवळ नोटांच्या चलनाचें प्रमुख तारण, म्हणून होतें. ६ ऑक्टोबर, १९५६ पासून त्या सोन्याची किंमत तोळयास ६२ रु. ८ आ. अशी धरण्यांत आली आहे. त्यामुळें, मूळचेंच सोनें त्या दिवसापासून ११७ कोटी, ७६ लक्ष रुपये किंमतीचें झालें आहे.

रिझर्व्ह बँक कायद्यांत कांहीं महिन्यांपूर्वी दुरुस्ती करण्यांत आली, तिचे अन्वयें सोनें व परदेशी रोखे ह्यांचा चलनाला आधार बदलून त्याचें टक्केवारीचे किंमतींत रूपांतर करण्यांत आलें आहे. म्हणजे, पूर्वीच्या कायद्यांत चलनाला आधार म्हणून सोनें व परदेशी रोखे किती असावेत ह्यांचें एकूण नोटांशीं टक्केवारीनें प्रमाण सांगितलें होतें; विदेशी रोखे + सोने ह्यांची बेरीज इश्यू खात्याच्या जिंदगीच्या दोनतृतियांशापेक्षा कमी असतां कामा नये, असा जुना कायदा होता. दुरुस्त कायद्याप्रमाणें, नोटा कितीहि वाढोत, ४०० कोटी रुपयांचे परदेशी रोखे व ११५ कोटी रुपयांचें सोनें ह्यावर काम भागवलें जाईल. तळघरांतील त्याच सोन्याची किंमत सुमारें तिप्पट धरून ११७कोटी रुपयांचें सोनें आतां करण्यांत आलें आहे. सोन्याच्या नवीन दरास इंटरनॅशनल मॉनेटरी फंडानें मान्यता दिलेली आहे. त्यामुळें, आज प्रत्यक्ष असलेल्या सोन्याचे वजनांत वाढ न होतां किंमतीच्या दृष्टीनें मात्र तें वाढलें आहे आणि किमान ११५ कोटी रुपयांची अट आपोआपच पुरी झाली आहे.

ऑक्टोबर, १९५५ अखेरचे व ऑक्टोबर १९५६ अखेरचे इश्यू खात्याचे तुलनात्मक आंकडे, लक्ष रुपयांचे.

| | एकूण चलनी नोटा | सोनें | विदेशी रोखे |
|---|---|---|---|
| ऑक्टो. १९५५ | १३१४·२१ | ४०·०२ | ६३२·०७ |
| | रुपये | | हिंदी रोखे |
| | ११०·९५ | | अ ५३१·१८ |
| | एकूण चलनी नोटा | सोनें | विदेशी रोखे |
| ऑक्टो. १९५६ | १४५१·९६ | ११७·७६ | ४९२·०७ |
| | रुपये | | हिंदी रोखे |
| | १२१·४९ | | ब ७२०·६९ |

## कंपनी कायदा कारभारमंडळाच्या प्रादेशिक कचेऱ्यांची पुनर्घटना

१५ डिसेंबर, १९५६ पासून कंपनी कायदा कारभारमंडळाच्या प्रादेशिक कचेऱ्यांची पुनर्घटना झाल्यामुळें मुंबई येथील या कारभारमंडळाच्या पश्चिम विभागाच्या प्रादेशिक संचालकाच्या नियंत्रणाखाली मुंबई व ग्वाल्हेर (म्हणजे पुनर्रचना झालेलीं मुंबई व मध्यप्रदेश राज्यें) येथील रजिस्ट्रार ऑफ कंपनीजच्या कचेऱ्या आल्या. मद्रास, कलकत्ता व कानपूर येथें अशाच आणखी तीन प्रादेशिक संचालकांच्या कचेऱ्या राहतील.

## कामगारांच्या सहकार्याची जरूरी

अखिल भारतीय राष्ट्रीय ट्रेड युनिअन काँग्रेसचे अध्यक्ष श्री. वसावडा ह्यांनीं पंचवार्षिक योजनेंतील कामगारांच्या स्थानाबद्दल पत्रकारांजवळ आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं कामगारांतर्फे करण्यांत आलेली वेतनवाढीची मागणी मान्य करण्यांत आली तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत दुसऱ्या मागण्या करण्यांत येणार नाहींत. आमच्या मागण्या प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळींच करण्यांत येतील. देशाच्या अर्थव्यवस्थेंत घोटाळा माजविण्यासारखी कोणतीहि गोष्ट कामगार करणार नाहींत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या यशासाठीं कामगारांनीं सरकारशीं सहकार्य केलें पाहिजे. संप, नासधूस अगर कमी काम करणें इत्यादि मार्गांचा अवलंब न करतां उद्योगधंदे चालविण्याचे कामीं त्यांनीं जास्तींत जास्त सहकार्य केलें पाहिजे. त्याचप्रमाणें त्यांनीं आपल्या कामाचा दर्जा वाढविला पाहिजे, आणि आपल्या वेतनांतील कांहीं भाग तरी नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटसमध्यें गुंतविला पाहिजे. कामगारांवर लवकरच मोठी जबाबदारी पडणार आहे. उद्योगधंद्यांच्या संचालनाची कांहीं जबाबदारी त्यांना आपल्या शिरावर घ्यावी लागणार आहे. ही जबाबदारी पेलण्यास योग्य होण्यासाठीं कामगारांची मानसिक तयारी होणें अगत्याचें आहे. कारखान्यांच्या व उद्योगधंद्यांच्या सर्व प्रकारच्या कारभारांत कसें काम करावें हें कामगारांनीं शिकलें पाहिजे. त्यासाठीं कामगारांच्या संघटनांनीं योग्य असे शिक्षणाचे वर्ग काढले पाहिजेत. समाजवादी पद्धतीची समाजरचना उभारण्याची जी घोषणा काँग्रेसनें केली आहे, त्यामुळें कामगारांवर चांगला प्रभाव पडलेला आहे. दिल्ली येथें संस्थेच्या कार्यासाठीं ३ लाख रुपये खर्चून इमारत बांधण्यांत येणार आहे.

## अभ्रकाच्या निर्यातीस उत्तेजन

भारतीय सरकारनें अभ्रकाच्या निर्यातीस उत्तेजन देण्यासाठीं मायका एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलची स्थापना केली आहे. अशा प्रकारचें हें आठवें कौन्सिल आहे. कौन्सिलच्या उद्‌घाटनाची घोषणा करतांना भारतीय सरकारचे व्यापारमंत्री. श्री. डी. पी. करमरकर म्हणाले कीं,आजकाल आंतरराष्ट्रीय व्यापार हा अधिक गुंतागुंतीचा व स्पर्धात्मक झाला आहे. अभ्रक ही वस्तु फार महत्त्वाची आहे आणि अभ्रकाच्या धंद्यांत खूप फेरबदल होण्याचा संभव आहे असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाहीं. अर्थातच अभ्रक निर्यात करणाऱ्या भारतीय लोकांनीं स्वयंसंतुष्ट राहातां कामा नये. गेल्या कांहीं वर्षांत विजेच्या उपकरणांच्या धंद्यांत नवे शोध लागत आहेत. अणुशक्तीचा उपयोग करणाच्या तंत्राबाबत तर हें अधिकच खरें आहे. ह्या शोधांमुळें अभ्रकाचा उपयोग व वापर वाढेल असें दिसत आहे. पण त्याचबरोबर दुसऱ्याहि बाजूकडे लक्ष दिलें पाहिजे. अभ्रक ही वस्तु गुरुकिल्लीसारखी महत्त्वाची असल्यानें अभ्रकाऐवजीं तत्सम दुसऱ्या वस्तू वापरतां येतील किंवा काय ह्यासंबंधीं संशोधन चालूं रहाणें साहजिक आहे.

अभ्रकाच्या किंमतींत स्थैर्य आणून, त्याच्याऐवजीं इतर वस्तू वापरण्याची प्रवृत्ति न होईल अशी दक्षता कौन्सिलनें घेतली पाहिजे. अशी दक्षता घेण्यांत आली तर विजेच्या उपकरणांच्या धंद्यांत होणारे बदल अभ्रकाच्या उद्योगधंद्याला उपकारक होतील. उलटपक्षीं, कमी प्रतीचा माल पाठविल्यानें व किंमतींत बेताल चढउतार केल्यानें आपलें गिऱ्हाइक तुटेल व धंद्याला अवकळा येईल. कित्येक देशांतून विजेच्या उपकरणाचा धंदा नव्यानेंच अस्तित्वांत आला आहे. त्यांनीं अभ्रकाचाच उपयोग करावा असे प्रयत्न आपण केले पाहिजेत.

## सहकारी साखर कारखाने

### श्री. मुळजी यांची अयोग्य व अन्याय्य टीका

दी डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनच्या १७ व्या वार्षिक सभेंत श्री. जयंतीलाल जे. मुळजी यांनीं आपले अध्यक्षीय भाषणांत सहकारी साखर कारखान्यांबाबत जे विचार व्यक्त केले आहेत* ते वाचून कोणाचीहि दिशाभूल होण्याचा संभव आहे. आजच्या बाजारभावाप्रमाणें साखर कारखान्याच्या उभारणीस एक कोटी रुपये भांडवल लागेल व त्या गुंतवणुकीचे मानानें व्याज सुटणें शक्य नाहीं; हें श्री. मुळजी यांचें म्हणणें सहकारी व खाजगी मालकीच्या अशा दोन्हीं प्रकारच्या कारखान्यांना सारखें लागू पडेल. अर्थात्, व्याजाची बिलकूल अपेक्षा न करतां पुंजीपती आपलें स्वतःचें भांडवल खाजगी कारखानदारींत गुंतविणार असतील तर गोष्ट वेगळी ! १० लाख रु. च्या भाग–भांडवलाची व इतर सरकारी मदत उपलब्ध असतांना सहकारी साखर कारखाने चालण्यास ही अडचण असेल तर ज्या खाजगी कारखानदारांना भांडवलाची सर्व सिद्धता स्वतःच्या हिंमतीवर करावयाची आहे व गुंतविलेल्या भांडवलावर जास्त व्याज सुटावें अशी ज्यांची अपेक्षा असते त्यांचे बाबतींत ही अडचण केवढी भासेल याची नुसती कल्पना करणें बरें !! साखर कारखाने काढण्यास आजची बाजारभावाची परिस्थिति अनुकूल नाहीं असें जर श्री. मुळजी यांनीं म्हटलें असतें तर तें तात्विकदृष्ट्या जास्त विचारार्ह ठरलें असतें व श्री. मुळजी यांचा सहकारी साखर कारखान्यांबाबतचा दृष्टिकोन पूर्वग्रहदूषित नाहीं असें तरी दिसलें असतें. त्यांनीं आपल्या भाषणांत, प्रवरा कारखाना अपवादात्मक ठरवून कोपरगांव कारखान्याचें जें उदाहरण दिलें आहे तेंहि त्यांच्या पूर्वग्रहांचें द्योतक मानावयास पाहिजे. त्याच विशिष्ट परिस्थितींत खाजगी कारखानदारांनीं सर्वसाधारणपणें काय केलें असतें हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तसेंच, सहकारी साखर कारखान्यांच्या कामगारांना भारी दरानें मजुरी द्यावी लागत नाहीं, हें श्री. मुळजी यांचें विधान सत्यावर आधारलेलें दिसत नाहीं. कारण, मजूरविषयक कायद्यांची अम्मलबजावणी सर्वांचे बाबतींत सारखी होते. नव्यानें निघालेल्या सहकारी साखर कारखान्यांना या बाबतींत कांहीं सवलती देणें योग्य असलें तरी त्या आज प्रत्यक्षांत दिल्या गेलेल्या नाहींत. प्रवरा सहकारी साखर कारखान्यानें आपल्या कामगारांना किमान वेतनाचा फायदा दिलेला आहे, तो कांहीं खाजगी साखर कारखान्यांतील कामगारांना अद्याप मिळालेला नाहीं अगर मिळत नाहीं. तसेंच, ज्याला २–३ महिन्यांचाहि गळिताचा हंगाम पुरा मिळाला नाहीं त्या कोपरगांव सहकारी साखर कारखान्यानें आपल्या कामगारांसाठी ज्या सुखसोई उपलब्ध करून दिल्या आहेत, त्या युद्ध नि युद्धोत्तर काळांत ज्यांनीं लाखों रुपये मिळविले अशा कांहीं खाजगी साखर कारखान्यांत अद्याप आढळत नाहींत ! ही वस्तुस्थिति आहे; मताचा प्रश्न नाहीं. ज्यांना आपल्या स्वतःच्या हिताशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं, त्यांना ही वस्तुस्थिति मान्य करणें गैरसोईचें होत असेल, पण त्यांनीं सत्याचा विपर्यास करण्याचा प्रयत्न करूं नये. सहकारी साखर कारखान्यांत शेतकऱ्यांना जे आर्थिक व इतर फायदे मिळतात ते सर्व फायदे आम्हीं त्यांना खाजगी कारखान्याचे सभासद करून घेऊन देणार आहोंत असें जर खाजगी कारखानदारांकडून निःसंदिग्ध रीत्या जाहीर करण्यांत आलें व अशा तऱ्हेचें वचन प्रत्यक्षांत पाळलें जाईल याबाबत सरकारची खात्री पटवून दिली तर शेतकऱ्यांचे सहकारी साखर कारखाने काढावयाचें कीं खाजगी साखर कारखानदारांना आणखी खाजगी साखर कारखाने काढूं द्यावयाचें याबाबतच्या धोरणाचा सरकार फेरविचार करूं शकेल. जरूर तेव्हां सत्याचा विपर्यास करून व वेळीं अवेळीं सहकारी साखर कारखान्यांची नालस्ती केल्यानें, मुंबई सरकारचें ह्या प्रश्नाबाबतचें धोरण बदलेल, अशी कोणी चुकीची समजूत करून घेऊं नये.

—एक सहकारी

* अर्थ : दि. २१ नोव्हेंबर, १९५६

## विज्ञानछंद*

( लोकविज्ञान मंडळानें चालविलेलें मासिक )

विज्ञानासंबंधीं किंवा वैज्ञानिकांच्या कार्याविषयीं माहिती देण्याबरोबरच वाचकांना स्वतःच्या हातांनीं कांहीं प्रयोग, कृति, प्रतिकृति पहाण्याची इच्छा व्हावी आणि तशी इच्छा झाल्यावर ते प्रत्यक्ष करतां यावेत, ह्यावर 'विज्ञानछंदा'च्या संपादकांचा भर आहे. "तांत्रिक किंवा शाब्दिक ज्ञान आपल्याकडे मिळण्याच्या कितीतरी सोयी उपलब्ध झाल्या आहेत. परंतु शास्त्रीय व तांत्रिक शिक्षणांत आपली प्रगति झपाट्यानें व्हायला हवी असा वारंवार उद्घोष चालू असूनहि व्यावहारिक व प्रायोगिक शास्त्रज्ञान वा शिल्पज्ञान संपादन करण्याच्या सोई व साधनें फारच थोडीं अस्तित्वांत आहेत. ही उणीव अंशतः दूर करावी, यासाठी 'विज्ञानछंद' आहे." गांवोगांवीं विखुरलेल्या व आपापल्या परीनें धडपडत असलेल्या अक्षरशः सहस्रो जिज्ञासूंना आजचें अद्यावत् शास्त्रीय व तांत्रिक ज्ञान शक्य त्या मर्यादेपर्यंत स्वतःच्या अनुभवानें मिळविण्याची सोय करणें ही संपादकांची महत्त्वाकांक्षा आहे. शास्त्रीय नियतकालिकांचें प्रकाशन अतिशय कठीण, दायित्वपूर्ण तर खरेंच; पण त्याची आवश्यकताहि निकडीची आहे ह्या दृष्टीनें संपादकांनीं हें पाऊल पुढें टाकलें आहे.

"विज्ञानछंदा"चे आतांपर्यंत दोन अंक प्रसिद्ध झाले असून त्यावरून संपादकांचा प्रयत्न यशस्वी झालाच पाहिजे, असें सहज पटतें. अनुभवाप्रमाणें मासिकाचें स्वरूप बदलत जाईल, पण 'स्व-यंत्र नाहीं तोंवर स्व-तंत्र नाहीं' ह्या ध्येयबुद्धीचा पाया कायमच राहील. संपादकांनीं पत्करलेल्या कार्याचा विस्तार आणि आवश्यकता लक्षांत घेऊन, सर्वांनीं त्याला अगत्य हातभार लावावा. लेखकांच्या सोईपेक्षा वाचकांची सोय अधिक लक्षांत घेतली जाईल अशी आम्हांस आशा आहे; तज्ज्ञांकडून योग्य प्रकारचे लेख मिळविण्यांतील अडचणी लक्षांत घेऊनच आम्हीं ही सूचना करीत आहोंत.

*मासिक, वा. व. ५ रु., संपादक : वि. द. आपटे, सहसंपादक : हरिभाऊ जोगळेकर, डिप्. टेक्. व ग. गो. दाते, बी. एस्सी. (ऑनर्स) ३४१, सदाशिव पेठ, पुणें २.

## इस्टेट ड्यूटीची रक्कम व कोर्ट फी स्टँप कोणीं भरावा ?

### अलाहाबाद हायकोर्टानें दिलेला महत्त्वपूर्ण निर्णय

कोणतीहि व्यक्ति मृत्यु पावल्यानंतर त्याच्या मृत्युपत्राप्रमाणें 'प्रोबेट' करितां अर्ज करणाऱ्या व्यक्तीला कोर्ट फी स्टँप भरल्याशिवाय प्रोबेट मिळूं शकत नाहीं; इतकेंच नव्हे, तर इस्टेट ड्यूटीची रक्कम भरल्यासंबंधीं मे. कंट्रोलर ऑफ इस्टेट ड्यूटी यांच्याकडून सर्टिफिकेट आणल्याशिवायहि प्रोबेट मिळूं शकत नाहीं.

अशा परिस्थितींत प्रोबेट मिळण्यापूर्वीं रकमेची तरतूद कशी करावी यासंबंधीं अलाहाबाद हायकोर्टापुढें एक प्रश्न उपस्थित झाला असतां मे. हायकोर्टानें पुढीलप्रमाणें निर्णय दिला :—

एक गृहस्थ मृत्युपत्र करून वारला. मृत्युपत्राप्रमाणें अर्जदार रेव्हरंड डॉ. एल्. रेमंड यांस मृत्युपत्राचे व्यवस्थापक म्हणून त्यानें नेमले होते. अर्जदार, डॉ. रेमंड, यांनीं प्रोबेटकरितां अर्ज केला. परंतु प्रोबेटची ऑर्डर देण्यापूर्वीं कोर्ट फी ॲक्टच्या सेक्शन १९-१ प्रमाणें त्यांना कोर्ट फी भरणें भाग होतें; आणि इस्टेट ड्यूटी ॲक्टच्या कलम ५७ ( बी ) प्रमाणें मे. कंट्रोलर ऑफ इस्टेटड्यूटी यांचेकडून इस्टेट ड्यूटी भरल्याचें सर्टिफिकेट दाखविल्याशिवाय 'प्रोबेटची' ऑर्डरहि देतां येत नव्हती.

इस्टेट ड्यूटी व कोर्ट फी मिळून एकूण रक्कम रु. ५२,३०२ भरणें आवश्यक होतें व अर्जदार रेव्हरंड डॉ. रेमंड यांच्याजवळ सदर रक्कम भरण्याची कुठलीहि तरतूद नव्हती.

अशा परिस्थितींत सदर रकमेची कशी व्यवस्था करतां येईल व 'प्रोबेट' देण्याची ऑर्डर कशी देतां येईल, असा प्रश्न उपस्थित झाला होता.

मयत इसमाच्या मिळकतीमधूनच वरील इस्टेट ड्यूटीची व कोर्ट फीची रक्कम भरावी लागणार होती हें उघड दिसत होतें. कायद्याच्या कुठल्याहि कलमामध्यें अर्जदारानेंच आपल्या इस्टेटी-मधून अशी फीची रक्कम भरावी असें बसत नव्हतें. मयत इसमाच्या नांवानें गोरखपूर येथील स्टेट बँक ऑफ इंडिया च्या शाखेंत सुमारें एक लक्ष रुपयांपेक्षा जास्त रक्कम चालू खात्यांत जमा दिसत होती. म्हणून माननीय न्यायमूर्तींनीं पुढीलप्रमाणें निर्णय दिला :—

न्यायमूर्ति म्हणाले, "वर निर्दिष्ट केलेल्या मुद्यावरून गोरखपूर बँचमधील मयत इसमाच्या खात्यांतून सदर प्रकरणांतील लागणारी इस्टेटड्यूटीची व कोर्ट फीची एकूण रक्कम रु. ५२,३०२ सदर कोर्टाच्या रजिस्ट्रारकडे ठेव म्हणून ठेवावी व ही रक्कम येतांच मे. कंट्रोलर ऑफ इस्टेट ड्यूटी यांनीं त्यांचा दाखला द्यावा व त्यानंतर अर्जदारास प्रोबेट द्यावें. सदरची डिपॉझिट रक्कम हीच पुढें इस्टेट ड्यूटी व कोर्ट फी करण्याकडे उपयोगांत आणावी."

गोरखपूर स्टेट बँकेच्या एजंटांस, लागणारी रक्कम मयत इसमाच्या खात्यामधून रजिस्ट्रारकडे ६ आठवड्यांच्या आंत पाठवावी असा हुकूम देऊन मा. न्यायमूर्तींनीं ही केस संपविली.

—"व्यापारी मित्र" डिसेंबर, १९५६

**व्यंगचित्रांना विषयांचा तुटवडा**— सुप्रसिद्ध ब्रिटिश व्यंगचित्रकार मि. डेव्हिड लो ह्यांनीं असें मत बोलून दाखविलें आहे कीं, युद्धपूर्वकाळाच्या मानानें आज व्यंगचित्राचा विषय हो शकणाऱ्या प्रसिद्ध व्यक्तींच्या संख्येंत घट झाली आहे. व्यंगचित्रांसाठी महात्मा गांधींच्या मानानें नेहरू कमी योग्य आहेत असेंहि त्यांचें मत आहे.


# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

**दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक**

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी, २४ बार्शी.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. २,४६,००० |
| ठेवी | रु. १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

# अन्नाचें रहस्य




**बेडेकर मसाले, लोणचीं, पापड**
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —



# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना १९१८

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

**राष्ट्राकरितां बचत करा.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. ७,५८,४०० |
| रिझर्व | रु. ६,९७,००० |
| ठेवी | रु. १,५९,००,००० |

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

## मंत्रिमंडळास आग्रहाची विनंती

### कूळकायद्यांतील नव्या दुरुस्त्या रद्द करा!

लेखक : स. वा. दातार, बी. एस्सी., एलएल्. बी.

'मुंबई राज्य कूळवहिवाट व शेतजमीन कायदा १९४८' ह्या कायद्यांतील १९५६ सालच्या १३ व्या दुरुस्ती कायद्यानें १ एप्रिल १९५७ हा 'कसणारांचा दिवस' ठरविण्यांत आला व त्या दिवशीं कूळवहिवाटीनें जमीन कसणारांनीं, ते कशीत असलेली शेतजमीन विकत घेतली असें समजण्यांत येईल असें कलम त्या कायद्यांत घालण्यांत आलें. तो दुरुस्तीचा कायदा रद्द करण्यांत यावा अशी आग्रहाची विनंती करणें हें ह्या लेखाचें एकमेव उद्दिष्ट आहे.

#### नैसर्गिक तारण

हिंदुस्थानांतील सर्वांत मोठा उत्पादक धंदा म्हणजे शेती होय. कसणाराविना शेती होणार नाहीं हें निर्विवाद खरें; परंतु शेतीच्या धंद्याची मदार कसणारावर एकपट तर निसर्गावर दसपट–शतपट ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. थोड्या कसणारांच्या मर्यादित मुदतीच्या मेहेनतीवर निसर्गाच्या मदतीनें फार मोठ्या समाजाची गरज भागेल एवढें अन्नधान्य शेतीपासून मिळतें. ह्यामुळें शेती हा प्रत्यक्ष व्यवसाय नसला तरी फार मोठ्या समाजाचा जीवनाधार शेती हा अनेक प्रकारांनीं ठरून गेलेला आहे. बिगर शेतकरी समाजाचा शेतीशीं जो अशाप्रकारें हितसंबंध निगडित झालेला आहे, तो प्रत्यक्ष जमिनीइतकाच जमीन कसणाराशींहि संबंधित आहे. कसणारांवर हा बोजा कमजास्त होणें शक्य असलें तरी कसणाऱ्यास डावलण्याची भूमिका ह्या संबंधांत असणेंच शक्य नाहीं. उत्पादक शेतजमीन ही कसणाराचे हातून कधींच निघूं शकलेली नाहीं व शकणारहि नाहीं. बिगर शेतकरीवर्गाचे शेतजमिनीशीं जे संबंध आहेत ते केवळ त्यांच्या हिताची हमी अथवा तारण ह्या स्वरूपाचेच फक्त आहेत. आपल्या देशाला हजारों वर्षांचा इतिहास आहे. त्यांत हजार वेळां हजार धामधुमी झालेल्या आहेत व हजार राजघराणीं व राज्यकारभाराचे प्रकार उदयास येऊन अस्तास गेले आहेत. ह्या सर्व काळांत गुंतविलेल्या हितसंबंधास खात्रीचें शहाजोग असें नैसर्गिक तारण म्हणून शेतजमीन ही उपयोगी पडलेली आहे. कसणाराचे पदरीं पाऊसपाण्याच्या अनुकूलतेप्रमाणें कमजास्त पीक दरवर्षी पडत असतें. त्यांतून विशिष्ट हिस्सा मिळणें एवढाच बिगर शेतकरी वर्गाच्या जमिनींतील हक्कसंबंधाचा अर्थ आहे; त्याशिवाय जास्त अर्थ ह्या हितसंबंधास व्यवहारतः कधींहि नव्हता व असण्याचें कारणहि नाहीं. देशांतील शेतीव्यतिरिक्त अन्य उद्योगधंद्यांत स्वतःच्या मेहनतीनें मिळविलेला व काटकसरीनें वापरून शिल्लक टाकलेला पैसा पडत्या काळाची तरतूद म्हणून गुंतवण्यास बिगर शेतकरीवर्गास जर हरकत नाहीं तर शेतजमिनींत तो गुंतविण्यास अथवा पिढ्यान्‌पिढ्या गुंतविलेला असला तर तो तसाच गुंतविलेला राहूं देण्यास हरकत काय म्हणून असावी? विधिमंडळांतील लोकप्रतिनिधींनीं बिगर-शेतकरी वर्गाच्या शेतजमिनींतील हितसंबंधींचें हें तारणात्मक स्वरूप लक्षांत घ्यावें व घाईघाईनें हे हितसंबंध नष्ट न करतां जरूर असेल तर त्यावर योग्य तीं नियंत्रणें तेवढींच घालावीत अशी आग्रहाची विनंती आहे.

#### शेतजमिनी व प्रादेशिक राष्ट्रीयत्व

त्यानंतर दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा कीं शेतजमिनींतील व स्थावरांतील हितसंबंधांशीं आपलें प्रादेशि[illegible] रा[illegible]त्व निग[illegible] झालेलें आहे ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. आपण गुजराथी, महाराष्ट्रीय, वगैरे असतों तें केवळ आपण गुजराथी अथवा मराठी भाषा बोलतों एवढ्या एकाच गोष्टीमुळें नव्हे तर त्या त्या प्रदेशांतील भूभागाशीं आपले अथवा आपले वाडवडील वा काकेमामे ह्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात व सतत मिळ-तांच त्या प्रदेशांतील स्थावरांशीं हितसंबंध जोडण्याची आपली मनीषा असते. मुंबईंत खपणारे पांढरपेशे, मजूर वा व्यापारी ह्यांचा सारा जीव गुजराथ–महाराष्ट्रांतील कोठल्यातरी खेड्यापाड्यांवर आसावलेला वा लुब्धावलेला असतो. तेथें त्याचें घरटें, झोपडें असतें वा शेतजमिनीचा तुकडा असतो. त्यांत त्याचा भाऊ–बाप वा अन्य कोणी सगासोयरा वावरत असतो. मुंबईतून त्याला मनिऑर्डरी जात असतात. जर कोणाचा असा स्थावरांतील हितसंबंध संपुष्टांत आलेला असेल तर तो नव्यानें संपादन करण्याकडे त्याचा सारा रोख लागलेला असतो. ही आपली विशिष्ट भूभागांतील टीचभर कां होईना पण जमिनीवर सत्तेनें पाय ठेवण्याची सोय असण्याची अपेक्षा व भावना तिनेंच आपले प्रादेशिक राष्ट्रियत्व ठरतें. तिनेंच आपण गुजराथी वा महाराष्ट्रीय ठरतों. तिनेंच आपले कुळाचार, वागणुकीची रीतभात व इतिहासपरंपरा सिद्ध होते. शेतकरी वा बिगर शेतकरी वर्गाच्या शेतजमिनींतील हितसंबंधास हा दुसरा आशय आहे; व तो बिलकूल उपेक्षणीय नाहीं. खेड्यापाड्यांत घरदार असलें तरी तें स्वावलंबी नसतें. त्याचेपासून उत्पन्न येण्याची सोय नसते. शेतजमिनीचे तसें नसतें. शेतजमिनींत उत्पन्न येतें व तें सुद्धां प्रत्यक्ष अन्नधान्याचें उत्पन्न येतें. मनुष्य सर्व बाजूंनीं निराधार होऊन खेड्यापाड्यांत आला तर त्याच्या हक्काच्या शेतजमिनीपासून मिळालेल्या चिपट्या मापट्याचा भाकरतुकडा तो खुशाल खाऊन राहूं शकतो. अन्न ही जीवनाची प्राथमिक भूक आहे. ती भागण्याला निर्वाणीचा आधार म्हणूनहि सर्व मनुष्यमात्राचा शेतजमिनींत हक्कसंबंध संपादन करण्याकडे ओढा असतो. ह्या प्रवृत्तींत आत्मसंरक्षणाची धडपड आहे. हा मुद्दा लक्षांत घेणें आवश्यक आहे.

#### पायगोवा घालविणें देशहिताचें नाहीं

बिगर शेतकरी समाजाच्या हितसंबंधाचीं पाळेंमुळें शेतजमि-नींत गुंतलेलीं राहण्यांतच आपल्या राष्ट्राचें हित आहे. देशाच्या भूप्रदेशांत ज्यांना कोठल्याच तुकड्यावर स्वामित्व ठेवतां येत नाहीं ते सारे लोक देशांत उपरे; भटके, भुरटे ठरतात. विशिष्ट देशाशीं संबंध असल्याची भावना त्यांच्या मनांत राहण्याचें कारण उरत नाहीं. मग त्या विशिष्ट देशाचा अभिमान धरून त्याचेसाठीं श्रम करण्याची, त्रास सोसण्याची, त्याग करण्याची वा प्रसंगीं मरणास सिद्ध होण्याची भावना तरी अशा लोकांत कशाचे आधारावर किती दिवस जिवंत राहूं शकेल? तेव्हां आपल्या देशाच्या एकंदर लोकसंख्येपैकीं मूठभर कसणारां-व्यतिरिक्त इतर साऱ्या समाजास शेतजमिनींत हितसंबंध ठेवण्यास बंदी करून त्यांचा पायगोवाचा नाहींसा करणें आपल्या राष्ट्राच्या हिताचें होणें सुतराम संभवनीय नाहीं. निश्चित व विनाश्रम उपजीविकेची सोय संपादन करून आपल्या देशांतील कांहीं लोकांनीं आपलें जीवन विद्याभ्यास, कला[illegible] समाजसेवा व देशभक्ति इत्यादिकांचे कारणीं लावलें [illegible] प्रकारच्या लोकांना शेतजमिनींनीं मोठा आधार दिलेला आहे. [illegible] आधार ह्या कायद्यानें नाहींसा होणार आहे. ही गोष्ट अ[illegible]

असण शक्य नाहीं; परंतु अभिप्रेत असली तरी तींत आपल्या राष्ट्राचें भयंकर अनहित आहे हें विसरून भागणार नाहीं.

### कसणारा हा स्वयंसंपूर्ण नाहीं

तिसरी महत्त्वाची गोष्ट अशी कीं कसणारा हा आपल्या समाजाचाच घटक असून त्याची जशी समाजाला गरज आहे, तशीच त्यालाहि समाजाची गरज आहे. वर्षाकांठीं हातीं येणारें पीक शेतकरी कांहीं एकदम खाऊन टाकूं शकत नाहीं, व एकदां खाऊन वर्षभर तो बिनभिकेचाहि राहूं शकत नाहीं. शेतांत पिकणारें अन्नधान्य साऱ्या समाजांत पुरविलें जातें व तें तसें पुरविण्यानेंच शेतकरी स्वतः जगतो आणि समाजालाहि जगवितो. मग बिगर कसणारा व कसणारा ह्यांचे परस्पर पसंतीनें शेत-जमिनीच्या अनुषंगानें परस्परावलंबी हितसंबंध उत्पन्न होण्यास व कायम राखलें जाण्यास सपशेल बंदी असण्याचें कारण काय? कारखानदार व कामगार ह्यांचे संबंध जर नियंत्रणानें सुरळीत ठेवतां येतात तर बिन कसणारा व कसणारा ह्यांचेतील संबंध तरी योग्य नियंत्रणानें कोणासहि जाचक व मारक होऊं नयेत अशी व्यवस्था करून चालूं ठेवण्यास व सुरक्षित राखण्यास काय हरकत आहे? शिवाय कसणाराशीं बिन कसणारांचे आज असलेले संबंध बरेचसे कसणारानें स्वखुषीनें जोडलेले आहेत. जमिनीची गहाण–दान–विक्री कसणारानें स्वखुषीनें केलेलीच नाहीं असें नाहीं. अशा स्थितींत कसणारा तेवढा आपल्या नवोदित स्वराज्याचा मानकरी आणि बिन कसणारा हा उपेक्षणीय, अशा थाटांत हा कायदा केलेला दिसतो हा मोठाच अन्याय आहे.

### समाजवादाचा हा मार्ग नाहीं.

धन व धनार्जन ह्यांचे बाबतींत नवे सिद्धान्त समाजवादानें अलीकडे मांडले गेले आहेत. यंत्रयुगीन समाजरचना परिणामीं समाजवादाकडेच जाणें अपरिहार्य आहे ही गोष्ट आतां बहुतांशीं मान्य झालेली आहे. त्यावरून समाजवाद त्वरित आणण्यासाठी हा कायदा करण्यांत आला आहे असें त्याच्या उद्दिष्टपत्रकांत नमूद करण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील शेतीच्या धंद्याची सर्वांगीण सुधारणा होऊन शेतीचें उत्पादन वाढावयास पाहिजे ह्याबद्दलहि आतां वाद राहिला नाहीं. परंतु मुख्य मुद्दा असा कीं, समाजवाद व शेती–सुधारणा ह्यांचा खरा मार्ग सामुदायिक वा सहकारी पद्धतीवर मोठ्या प्रमाणांत यांत्रिक पद्धतीनें शेती करणें हा असल्याचें सिद्ध झालेलें असतांना ह्या कायद्यानें त्याचेकडे पाठ फिरवून सध्यां असलेल्या लोकांची शेतजमिनी-वरील मालकी निष्कारण हट्टाहासानें नाहींशीं करून जमिनीचें चतकोर–नितकोर धारण करणारे असंख्य मालक ह्या कायद्यानें उत्पन्न केले जात आहेत व त्यांच्या मोठ्या प्रमाणावर यांत्रिक शेती करण्याचे कामास पुढें अडथळाच येणार आहे. अशा प्रकारें हा कायदा समाजवादाचे दृष्टीनेंहि निरुपयोगी नव्हे, उपद्रवकारकच ठरणार आहे. समाजवादांत राष्ट्राचे प्रत्येक घटकास रोजगार व अन्नाच्छादन पुरविण्याची जबाबदारी ...रावर असते. ती जबाबदारी तर आपल्या सरकारनें ...प घेतलेली नाहीं. तेव्हां अशा स्थितींत समाजांतील कांहीं घटकांचे सध्यां उपलब्ध असलेले उपजीविकेचे आधार नाहींसे ...रून त्यांना निराधार करण्याचा अधिकारहि सरकारला मिळत ...ीं. ह्यासाठी समाजवादाचें ध्येय गांठण्याचे दृष्टीनेंहि ह ...दा करून समाजांत सरकारनें अस्थिरता निर्माण होऊं देऊं नये· ...ीं देशांत उद्योगधंदे वाढावेत व त्यांत अधिकाधिक लोकांना रोजगार मिळावा ह्याकडे सरकारनें अगोदर लक्ष लावावें व तें साधल्यावर मग शेतजमिनींचें राष्ट्रीयीकरण करून सामुदायिक यांत्रिक शेतीस प्रारंभ करावा आणि देशाचें कृषिउत्पादन वाढवावें हाच मार्ग खरा समाजवादाचा, समाजहिताची व राष्ट्र-हिताचा आहे.

वरील सर्व देशांतील अन्य विचारवंतांनीं मांडलेले विविध विचार लक्षांत घेऊन मुंबई राज्याचे मंत्रिमंडळानें व लोकप्रतिनिधींनीं बिगर शेतकरी समाजाचे शेतजमिनीतील हितसंबंध नष्ट करणारा वरील दुरुस्तीकरणाचा (कूळवहिवाट) कायदा रद्द करावा व बिगरशेतकरी समाजाच्या शेतजमिनींत गुंतलेल्या हितसंबंधास योग्य ती प्रतिष्ठा व संरक्षण मिळवून द्यावें अशी आग्रहाची प्रार्थना आहे.

---

**पोलादाच्या कारखान्याला कर्ज**—इंडिअन आयर्न अँड स्टील कंपनीला २ कोटी डॉलर्सचें कर्ज देण्याचें जागतिक बँकेनें ठरविलें आहे. कांहीं महिन्यांपूर्वीं जागतिक बँकेनें टाटा स्टील कंपनीलाहि कर्ज दिलेलें आहे. बँक अधिक महत्त्वाच्या आर्थिक योजनांना अग्रहक्क देत आहे असें दिसतें.

**तंजावर जिल्ह्यांत साखरेचा कारखाना**—तंजावर जिल्ह्यांतील मानरगुडी ह्या ठिकाणीं खाजगी मालकीचा एक साखरेचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्याची यंत्र-सामुग्री पोलंडमधील कारखान्याकडून घेण्यांत येणार आहे. रोज ८०० टन ऊंस गाळण्याइतकी तिची शक्ति असेल.

**लेथसूच्या उत्पादनाचा उच्चांक**—भारतीय सरकारच्या मालकीच्या हिंदुस्थान मशीन टूल फॅक्टरींत गेल्या महिन्यांत २४ लेथसूचें उत्पादन करण्यांत आलें. एका महिन्यांत झालेल्या उत्पादनाचा हा उच्चांक आहे. १९५६–५७ च्या आर्थिक वर्षांत ५७ लेथस् निर्माण करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. आतां त्याहीपेक्षा बरेंच अधिक उत्पादन होईल.

**तिबेटांत जाणारे रस्ते**—उत्तर प्रदेशांतील डोंगराळ भागांतून तिबेटांत जाणारे ४ नवे रस्ते बांधण्याचें काम राज्य सरकारनें चालूं केलें आहे. अलमोरा, गढवाल व तेहरी जिल्ह्यांत ५०० मैल लांबीचे नवे रस्ते बांधण्याचा कार्यक्रम सरकारनें हातीं घेतला आहे. ह्या रस्त्यांपैकीं कांहीं रस्ते मोटारींनीं वहातूक करण्यास योग्य असे असतील.

**सांगली येथील मैदानी नाट्यगृह**—येत्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्तानें सांगली शहराच्या नगरपालिकेनें मैदानांतील खुल्या नाट्यगृहाचें उद्घाटन करण्याचें ठरविलें आहे. ह्या नाट्यगृहासाठी ३७,००० रुपये खर्च आला आहे. मुंबई सरकारनें ह्या कामासाठी २४,००० रुपयांची मदत दिली आहे. नाट्यगृहाचें काम पुरें होत आलें आहे.

**उच्च तांत्रिक शिक्षणाची संस्था**—भारतांत उच्च तांत्रिक शिक्षण देणारी एक संस्था काढण्यासाठी अमेरिकेनें मदत देऊं केली आहे. अशाच प्रकारची आणखी एक संस्था काढण्याच्या कामांत पश्चिम जर्मन सरकारच्या तंत्रज्ञांचें एक मंडळ सध्यां भारताच्या दौऱ्यावर आहे.

**विजेचे दर सर्वत्र सारखे**—जोग धरणावरील विद्युत् केंद्रांत उत्पन्न करण्यांत येणाऱ्या विजेचे दर नव्या म्हैसूर राज्यांत सर्व ठिकाणीं सारखे रहातील, असें म्हैसूरच्या उद्योगमंत्र्यांनीं जाहीर केलें आहे. म्हैसूर भागांत ज्या दरानें वीज पुरविण्यांत येते त्याच दरानें नवीन वीज पुरविण्यांत येणार आहे.

### सबंध मुंबई राज्यासाठी एकच केंद्रीय सहकारी बँक

रिझर्व्ह बँक, सौराष्ट्र स्टेट को. बँक, विदर्भ को. बँक, बाँबे स्टेट को. बँक व मराठवाडा आणि विदर्भ ह्यांतील जिल्हा सहकारी बँका ह्यांच्या प्रतिनिधींची बैठक मुंबई येथें गेल्या आठवड्यांत सचिवालयांत भरली होती. सबंध मुंबई राज्यासाठी एकच केंद्रीय सहकारी बँक असावी, हें तत्त्व सभेनें मान्य केलें. तथापि, तात्पुरती व्यवस्था आणि पुनर्व्यवस्थेची सोय ह्यासाठी सौराष्ट्र स्टे. को. बँक सध्यांप्रमाणेंच जास्तींत ज्यास्त तीन वर्षे चालू रहावी, असेंहि ठरलें. ज्या जिल्ह्यांतून मध्यवर्ती सहकारी बँका नाहींत, तेथें त्या तीन वर्षांत स्थापन करण्यांत याव्यात, असेंहि ठरविण्यांत आलें. बाँबे स्टेट को. बँकेची घटना बदलून ती बँक केवळ फेडरल स्वरूपाची करण्यांत यावी आणि कारभाराच्या सोईसाठी डिव्हिजनल बोर्डें स्थापण्यांत यावींत. असेंहि सुचविण्यांत आलें.

### श्री. हंडू ह्यांना पेन्शन व ग्रॅच्युइटी

स्टेट बँकेचे माजी मॅनेजिंग डायरेक्टर श्री. हंडू हे १ ऑक्टोबर, १९५६ पासून सेवानिवृत्तीपूर्वीच्या रजेवर गेले. त्यांना दरमहा १,००० रु. पेन्शन व २०० रु. महागाई भत्ता स्टेट बँकेच्या नियमांप्रमाणें मंजूर करण्यांत आला आहे. १२ जून, १९५८ पासून, म्हणजे श्री. हंडू ह्यांच्या सेवानिवृत्तीपासून, त्यांना वरील पेन्शन व महागाईभत्ता मिळेल. स्टेट बँकेच्या सेंट्रल बोर्डानें त्यांना २ लक्ष रुपये ग्रॅच्युइटीहि मंजूर केली आहे.

### सर मालकम डार्लिंग ह्यांना पाचारण

भारत सरकारच्या विनंतीस अनुसरून, सर मालकम डार्लिंग हे भारतांत येत आहेत. सहकारी चळवळीच्या क्षेत्रांतील गेल्या कांहीं वर्षांतील प्रगतीचा ते आढावा घेतील व राज्यांतील सहकारी खात्यांची वाढ व सहकारी खात्यांतील नोकरांच्या शिक्षणाची व्यवस्था, ह्याबाबत शिफारशी करतील. कोलंबो योजनेच्या तांत्रिक सहकाराच्या योजनेनुसार, ब्रिटिश सरकारनें सर मालकम डार्लिंग ह्यांना वरीलप्रमाणें काम करण्यास संमति दिली आहे.

### फरिदकोटच्या राजाची एथिओपिआंत वसाहत

फरिदकोटचे माजी संस्थानिक, राजा हरेंद्रसिंह, हे एथिओपिआ देशांत स्थाइक होणार आहेत. तेथील ५,००,००० एकर जंगली प्रदेश ह्यांनीं मिळविला असून तेथें ते आपली वसाहत करतील. सुमारें २,००० हिंदी लोक त्यांचेबरोबर जाणार आहेत.

### इजिप्तमधील यु. नेशन्सच्या सैनिकांचा विमा

इजिप्तमधील युनायटेड नेशन्सच्या संरक्षक दलांतील प्रत्येक सैनिकाचा युनायटेड नेशन्सनें विमा उतरविलेला आहे. प्रत्येक हिंदी, युगोस्लाव, नॉर्वेजिअन, डेन, स्वीड, कनेडिअन व कोलंबिअन सैनिकाचा ८,००० पौंडांचा विमा, म्हणजे एकूण ४·८ कोटी पौंडांचे विमे होतात. एका अमेरिकन कंपनीस हें काम मिळालें आहे. हप्ता दरहजारीं ८० पौंड आहे.

### लघुलेखिकेचा गौरव

लंडनमधील मिस ऑड्रे बेल नांवाच्या लघुलेखिकेनें दर मिनिटाला २५० शब्द ह्याप्रमाणें पांच मिनिटें लघुलेखन केलें. ह्यापूर्वीचा उच्चांकहि इतकाच आहे. ती पिटमन पद्धतीनें लिहिते. पिटमन कॉलेजच्या बक्षिस समारंभांत तिला सुवर्णपदक देण्यांत आलें. तिचें वय २० वर्षांचें आहे.





**कण आणि क्षण**
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक: –श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. २ रु. ८

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]
**मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.**
**शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थो…, उपाध्य…
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन वसूलीकरण व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते – दराबाबत समक्ष चौकशी करावी.
पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पास… विठोबानजीक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.